वा.ले.अ.सन २०१९-२०/1

Nmc/Audit/OWY200

नाशिक महानगरपालिका,नाशिक
मुख्यलेखापरिक्षक यांचे कार्यालय,
जा.क्र/मुलेप/डेस्क-4/ १०७२/२०२०,
दिनांक- २१ /१२ /२०२०.

Sec
Chief Auditor

आयुक्त कार्यालय
नाशिक महानगरपालिका
दि. २२/१२/२०
आयुक्त

प्रति,
मा. सभापती,
स्थायी समिती,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

**विषय :-** मुख्य वित्त व लेखा विभागाचे सन 2019-20 या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेख्यांचा लेखापरिक्षण अहवाल.

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन नगरविकास परिपत्रक क्र.लोलेस २०१६/प्र.क्र.०३/नवि-३१ दि. २२/०१/२०१६.
२) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/६/२० दि.९/०४/२०२०
३) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/०८/२० दि.१५/०४/२०२०
४) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/०९/२० दि.१५/०४/२०२०
५) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/१०/२० दि.१५/०४/२०२०
६) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/११/२० दि.१५/०४/२०२०
७) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/२७/२० दि.१६/०४/२०२०
८) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-४/५३/२० दि.११/०५/२०२०
९) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-९/६३/२० दि.१८/०५/२०२०
१०) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/६४/२० दि.१८/०५/२०२०
११) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/६५/२० दि.१८/०५/२०२०
१२) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-५/८३/२० दि.०४/०६/२०२०
१३) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-९/९०/२० दि.१०/०६/२०२०
१४) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-४/१३१/२० दि.१४/०७/२०२०
१५) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-४/७९८/२० दि.२७/११/२०२०
१६) मुलेप कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-४/१०४२/२०दि.१८/१२/२०२०

श्री.पगोळे

सन २०१९-२० चे वार्षिक लेखे (जमा खर्च) संदर्भातील अभिलेखे तपासणीकामी लेखा विभागाने लेखापरिक्षण विभागास सादर केले होते. त्यानुसार लेखा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या लेख्यांच्या आधारे सन २०१९-२० वार्षिक लेख्यांची तपासणी करण्यात आली असता खालील प्रकारच्या आक्षेपार्ह बाबी आढळुन आल्या.

## परिच्छेद क्र. १ वर्षनिहाय जमा व खर्चाची संक्षिप्त आकडेवारी :-

### १-अ) :- सन २०१९-२० जमा खर्चाची संक्षीप्त आकडेवारी तपशिल पुढील प्रमाणे आहे :-

(रू. लाखात)

| अंदाजपत्रक | मा.आयुत्तांनी शिफारस केलेले अंदाज | मा.स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज | मा.महासभेचे मुळ अंदाजपत्रक | सुधारीत अंदाजपत्रक | प्रत्यक्ष जमा व खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अ) जमा | | | | | |
| Aप्रारंभिची शिल्लक | २२७९२.४३ | २२७९२.४३ | २२७९२.४३ | ४८५२०.६२ | ४८५२०.४७ |
| अंदाजपत्रक अ | १४६६५८.१० | १५५०५८.१० | १९०२९५.७१ | १४१६३९.०१ | १४३३७०.३४ |
| अंदाजपत्रक क | ११८३१.०० | १२३३१.०० | १२३३१.०० | ९२१२.५० | ८४५१.१४ |
| अंदाजपत्रक प | १७८.०० | १७८.०० | १७८.०० | १७२.५० | १५८.७२ |

वा.ले.अ.सन २०१९-२०/2

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण (अ+क+प) | १५८६६७.१ | १६७५६७.१ | २०२८०४.७१ | १५१०२४.०१ | १५१९८०.२ |
| Cइतर उचल परत जमा | ७९९०.०० | ७९९०.०० | ७९९०.०० | ९०९१.०० | ७३१३.७१ |
| एकूण एकंदर जमा(+) | १६६६५७.१ | १७५५५७.१ | २१०७९४.७१ | १६०११५.०१ | १५९२९३.९१ |
| प्रारंभिक(+) शिल्लकेसह एकूण जमा | १८९४४९.५३ | १९८३४९.५३ | २३३५८७.१४ | २०८६३५.६३ | २०७८१४.३८ |
| ब) खर्च (महसुली) अ.क.प | १०१६४०.८५ | १०१९७०.८५ | १०२६२०.८५ | १०४१८१.६१ | ९०१५३.०७ |
| भांडवली खर्च अ.क.प | ८२१२३.५० | ९०६५१.५० | १२५२३९.११ | ६४०१६.९२ | ३९८२९.४८ |
| इतर उचल जमा | ५५९९.५० | ५५९९.५० | ५५९९.५० | ८५३९.०० | ३८४४.६० |
| एकूण एकंदर खर्च | १८९३६३.८५ | १९८२२१.८५ | २३३४५९.४६ | १७६७३७.५३ | १३३८२७.१५ |
| अखेर शिल्लक | ८५.६८ | १२७.६८ | १२७.६८ | ३१८९८.०९ | ७३९८७.२३ |
| एकूण एकंदर | १८९४४९.५३ | १९८३४९.५३ | २३३५८७.१४ | २०८६३५.६२ | २०७८१४.३८ |

मागील वर्ष सन २०१८-१९ अखेरची जमा-खर्च व डेबुक नुसार शिल्लक रक्कम रुपये ४८५२०.४७ लक्ष असुन सन २०१९-२० च्या मुळ अंदाजपत्रकात मागील वर्षाअखेरची शिल्लक हीच पुढील वर्षाची प्रारंभिची शिल्लक रक्कम रुपये ४८५२०.४७ लक्ष असणे आवश्यक होते. मात्र सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकात प्रारंभिची शिल्लक रक्कम रुपये २२७९२.४३ लक्ष इतकीच दर्शविणेत आली. म्हणजेच रक्कम रुपये २५७२८.०४ लक्ष इतकी कमी दर्शविणेत आलेली आहे. विभागाने सांखिकी तपशिलाची अचुकतेची खात्री करणे आवश्यक आहे. ज्या अन्वये जमा उत्पन्न वास्तववादी दिसेल.

सन २०१९-२० या वर्षीच्या अंदाजपत्रकात जमा रक्कमेचे अंदाज प्रारंभिक शिल्लक र. रू. २२७.९२ कोटी धरून एकूण अंदाज र. रू. २३३५८७.१४ कोटी धरले परंतु प्रत्यक्षात जमा मात्र र. रू. १५९२.९४ कोटी जमा झालेत म्हणजेच जमा मुळ अंदाजापेक्षा (प्रारंभिक शिल्लक वगळुन) र.रु. ५१५.०१ कोटी इतकी कमी रक्कम जमा झालेली आहे. वित्तिय वर्षे सन २०१८-१९ मध्येही प्रत्यक्ष जमा जमा र. रू. १३४७.८३ कोटी होती. त्याअनुषंगाने अर्थसंकल्पात वाढ दर्शविणे आवश्यक असतांना अवास्तव अंदाज दर्शविण्यात आलेत. त्यामुळे मनपाचे खर्चाचे वास्तववादी नियोजन करण्यास अडचणी येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरी यापुढे वास्तववादी असण्याकडे प्रयत्न करावे.

**<u>१-ब) मागील तीन वर्षाची अर्थसंकल्पीय तरतुदीची संक्षीप्त आकडेवारी :-</u>**

मागील तीन वर्षातील मा. आयुक्त, मा. स्थायी समिती, मा. महासभा यांचे अंदाज तसेच प्रत्यक्ष जमा व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रू. कोटीमध्ये)

| वर्ष | मा.आयुक्त | मा.स्थायी समिती | मा.महासभा | प्रत्यक्ष जमा | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | १३५७.९६ | १७३७.९६ | १७६१.५२ | १२२५.५३ | १०८०.८६ |
| २०१७-१८ | १४१०.०८ | १७९९.३० | २१७६.४१ | १४४२.०५ | ११४३.९३ |
| २०१८-१९ | १४५३.४० | १७८५.१५ | १९००.१५ | १६४५.९५ | ११६०.७४ |
| एकूण | ४२२१.४४ | ५३२२.४१ | ५८३८.०८ | ४३१३.५३ | ३३८५.५३ |
| सरासरी | १४०७.१४ | १७७४.१४ | १९४६.०३ | १४३७.८४ | ११२८.५१ |

उपरोक्त विवरण पत्रावरून व अर्थकंल्पीय विवरणावरून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहेत. अर्थसंकल्प वास्तववादी होण्यासाठी मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रकमा, थकबाकी रक्कम या गृहीत धरणे आवश्यक आहे व त्यावर आधारीत चालु अर्थसंकल्पात जमा गृहीत धरली पाहिजे. परंतु उपरोक्त तक्त्यावरून दिसुन येते की, मागील ३ वर्षातील प्रत्यक्ष जमा रकमा खुप कमी आहेत. त्या तुलनेत मागील तीन वर्षाची जमेची सरासरी १४३७.८४ कोटी असतांना सन २०१९-२० या वित्तीय वर्षात मुळ अंदाजपत्रकानुसार र. रू. २३३५.८७ कोटी एवढी जमा रक्कम अंदाजीत केलेली होती. तथापि, प्रत्यक्ष र. रू. २०७८.१४ कोटी जमा झाली आहे. तसेच मागील तीन वर्षाची खर्चाची सरासरी ११२८.५१ असतांना मुळ अंदाजपत्रकानुसार खर्च रूपये २३३४.५९ कोटी अंदाजीत केलेला होता. प्रत्यक्षात रूपये १३३८.२७ कोटी प्रत्यक्ष खर्च केला आहे. यामुळे अंदाजपत्रकातील रकमा या वास्तववादी असण्याकडे यापुढे प्रयत्न व्हावेत.

**<u>1क) सन २०१९-२० प्रत्यक्ष उत्पन्न व तरतुदीमधील मोठ्या फरकाबाबत.(उदा.)</u>**

| अ.क्र | जमा बाजु लेखा शिर्ष | कोड नं. | मा.आयुक्त यांची मुळ अंदाजपत्रक (र.रू लाखात) | मा. महासभेने मंजुर कलेले अंदाजपत्रक (र.रू लाखात) | जमा रक्कम रूपये (र.रू लाखात) | तफावत र. रू. (५-६) (र.रू लाखात) | तरतुदीपेक्षा कमी उत्पनाची टक्केवारी(र.रू लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | विकास शुल्क | ११३७ | ४०००.०० | १००००.०० | ७५७९.६५ | २४२०.३५ | २४.२०% |
| | हार्डशिप प्रिमियम फी | १३५२ | १००००.०० | २९०००.०० | २५८२.८८ | २६४१७.१२ | ९१.०९% |
| | प्रशमित संरचना शुल्क | १३६१ | २५००.०० | ८२००.०० | ०.०० | ८२००.०० | १००% |
| | रोड डॅमेज फी | १२१६ | १५००.०० | २०००.०० | १०४९.३२ | ९५०.६८ | ४७.५३% |
| | | एकुण | १८००० | ४९२०० | ११२११.८५ | ३७९८८.१५ | ७७.१२% |

वरील उदाहरणादाखल लेखाशिर्षामध्ये मा. आयुक्त याचे मुळ अंदाज पत्रकात र. रू. १८०.०० कोटी जमा अपेक्षित धरली होती. मात्र मा. महासभेने तयार केलेल्या अंदाजपत्रकात सदर लेखाशिर्षामध्ये वाढ करून र. रू. ४९२.०० कोटी इतकी जमा दाखविणेत आली.

मात्र वर्षाअखेर ती प्रत्यक्षात र. रू. ११२.१२ कोटी इतकीच जमा झाली. म्हणजे र. रू. ३७९.८८ कोटी कमी जमा झाली असुन याप्रमाणे कमी रकमा मनपास प्रत्यक्षात जमा झालेल्या आहेत. मात्र उपरोक्त प्रमाणे महसुल गोळा होण्याच्या अपेक्षेने उत्पन्नापेक्षा जादा विविध विकास कामांची प्रकरणे सादर/मंजुर झालेली आहे. त्यामुळे म. न. पा. च्या दायित्वामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. सबब वार्षिक अंदाजपत्रक वास्तववादी असणे आवश्यक आहे.

**<u>१-ड ) महत्वाच्या जमा रक्कमांबाबतचा उदिष्ट पुर्ततेबाबत :-</u>**

सन २०१९-२० मध्ये उदा. १) मालमत्ता कराची अंदाजीत जमा रूपये महासभा अंदाजपत्रकात ८६.५८ कोटी इतकी मुळ अर्थसंकल्पात व सुधारित अर्थसंकल्पात ४८.५० कोटी रूपये दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्षात जमा मात्र ४७.८६ कोटी रूपये इतकीच जमा झाली. म्हणजेच मुळ अंदाजपत्रकाच्या ३८.७२ कोटी इतकी कमी जमा झाली, मुळ अंदाजपत्रकाच्या ४४.७२२% इतकी कमी जमा झालेली आहे. २) हार्डशिप प्रिमियम फी अंदाजीत जमा रूपये महासभा अंदाजपत्रकात २९०.०० कोटी इतकी मुळ अर्थसंकल्पात व सुधारित अर्थसंकल्पात २५.०० कोटी रूपये दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्षात जमा मात्र २५.८३ कोटी रूपये इतकीच जमा झाली. म्हणजेच मुळ अंदाजपत्रकाच्या २६४.१७ कोटी इतकी कमी जमा झाली, मुळ अंदाजपत्रकाच्या ९१.०९३% इतकी कमी जमा झालेली आहे. याप्रमाणेच इतर जमा रकमांचे अंदाजातही मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आल्याचे दिसुन येते. यामुळे अर्थसंकल्पीय तरतुद वास्तववादी असण्याच्या दृष्टीने दक्षता घेणे आवश्यक आहे.

वा.ले.अ.सन २०१९-२०/4

## सन २०१९-२० लेखाशिर्षानिहाय काही जमा रक्कमांचा गोषवारा

| अ.क्र | जमा बाजु लेखा शिर्ष | कोड नं. | मा.आयुक्त यांची मुळ अंदाजपत्रक (र.रू लाखात) | मा. महासभेने मंजुर कलेले अंदाजपत्रक (र.रू लाखात) | जमा रक्कम रूपये (र.रू लाखात) | तफावत र. रू. (५-६) (र.रू लाखात) | तरतुदीपेक्षा कमी उत्पनाची टक्केवारी(र.रू लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जमिन घरपट्टी यावरील कर | ११०८ | ८६५८.०० | ८६५८.०० | ४७८५.८७ | ३८७२.१३ | ४४.७२% |
| २ | मधवर्ती सरकारच्या इमारतीवरील सेवा आकार | १११२ | १९६.०० | १९६.०० | १.०७ | १९४.९३ | ९९.४५% |
| ३ | सर्वसाधारण स्वच्छता कर | १११६ | १४८७.०० | १४८७.०० | ९१२.१५ | ५७४.८५ | ३८.६६% |
| ४ | इमारतगाळेखुल्या जागा प्रिमियम मोबदलाहस्तांतरण फी | ११२३ | ११३८.०० | ११३८.०० | ७४५.०६ | ३९२.९४ | ३४.५३% |
| ५ | वृक्ष संवर्धन कर | १११९ | ३०१.०० | ३०१.०० | १६४.५१ | १३६.४९ | ४५.३५% |
| ६ | सार्व. बाजारपेठेच्या विक्री मांडणी फी | ११३० | २२०.०० | २२०.०० | १३७.४७ | ८२.५३ | ३७.५१% |
| ७ | विकास शुल्क | ११३७ | ४०००.०० | १००००.०० | ७५७९.६५ | २४२०.३५ | २४.२०% |
| ८ | स्थानिक संस्था कर जमा | १३०२ | २४०.०० | २४०.०० | ०.०० | २४०.०० | १००% |
| ९ | स्थानिक संस्था कर व्याज | १३०३ | ६४.०० | ६४.०० | ०.०० | ६४.०० | १००% |
| १० | स्थानिक संस्था कर/वस्तु व सेवा कर सहा. अनुदान | १३४० | ९४३८७.०० | ९४३८७.०० | ८६५२६.०० | ७८६१.०० | ८.३३% |
| ११ | जीना- पॅसेज प्रिमियम फी | १३४९ | २००.०० | २००.०० | ०.०० | २००.०० | १००% |
| १२ | हार्डशिप प्रिमियम फी | १३५२ | १००००.०० | २९०००.०० | २५८२.८८ | २६४१७.१२ | ९१.०९% |
| १३ | प्रशमित संरचना शुल्क | १३६१ | २५००.०० | ८२००.०० | ०.०० | ८२००.०० | १००% |
| १४ | वॉरंट फी (नमपा) व्याज | ११४० | २०९.०० | २०९.०० | ९८.८२ | ११०.१८ | ५२.७२% |
| १५ | जमिन व इमारत यावरील कराचा बरणा विलंबाने केल्याने दंड आकारणी | १३०० | ५०४३.०० | ५०४३.०० | २३०६.१२ | २७३६.८८ | ५४.२७% |
| १६ | परिवहन सेवा उत्पन्न | १३६२ | १०००.०० | १०००.०० | ०.०० | १०००.०० | १००% |
| १७ | जललाभ कर | १२०९ | ९९५.०० | ९९५.०० | ६०३.७४ | ३९१.२६ | ३९.३२% |
| १८ | मलनि:सारण कर | १२१० | २४९४.०० | २४९४.०० | १५०९.७० | ९८४.३० | ३९.४७% |
| १९ | पंतप्रधान आवास योजना अनुदान | १३४३ | ३००.०० | ३००.०० | १.५३ | २९८.४७ | ९९.४९% |
| २० | मलेरीया अनुदान | ११५६ | ३००.०० | ३००.०० | ०.०० | ३००.०० | १००% |
| २१ | जैविक कचरा विल्हेवाट व त्यावरील रॉयल्टी | १३४१ | ४५.०० | ४५.०० | ०.०० | ४५.०० | १००% |
| २२ | नर्सिंग कॉलेजपासुन मिळणारे उत्पन्न | १३४२ | २.०० | २.०० | ०.०० | २.०० | १००% |
| २३ | फेरीवाला दैनंदिन जागा लायसेन्स फी | १३१२ | १.०० | १.०० | ०.०० | १.०० | १००% |
| २४ | फाळके स्मारक निधीतुन जमा | १२४१ | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ५०.०० | १००% |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | मोबाईल टॉवर फी | १२९४ | २०.०० | २०.०० | ०.०० | २०.०० | १००% |
| २६ | धनादेश वटवनावळ फी /दंड | १२९७ | १.०० | १.०० | ०.०० | १.०० | १००% |
| २७ | रस्ते बांधणे व त्याचे परिरक्षण अनुदान | ११५० | ५००.०० | ५००.०० | २५०.०० | २५०.०० | ५०% |
| २८ | विशेष अनुदान | १२८२ | ५००.०० | ५००.०० | ०.०० | ५००.०० | १००% |
| २९ | पाण्याचा नळ जोडण्याची फी | १२१४ | १००.०० | १००.०० | ५०.८७ | ४९.१३ | ४९.१३% |
| ३० | रोड डॅमेज फी | १२१६ | १५००.०० | २०००.०० | १०४९.३२ | ९५०.६८ | ४७.५३% |
| ३१ | ड्रेनेज जोडणी फी | १२१९ | २००.०० | २००.०० | ६.२८ | १९३.७२ | ९६.८६% |
| ३२ | मुदतबाह्य अनामत जमा | ११९० | ५.०० | ५.०० | ०.०० | ५.०० | १००% |
| ३३ | मनपा शिक्षण विभागास शासन हिश्याची 50 % रक्कम अग्रीम परतभरती | १३५६ | ३६००.०० | ३६००.०० | ०.०० | ३६००.०० | १००% |
| ३४ | राखीवनिधीचे रोखीकरण (वेतन घसारा राखीवनिधी) | १३०९ | २०००.०० | २०००.०० | ०.०० | २०००.०० | १००% |
| | | एकुण | १४२२५६ | १७३४५६ | १०९३११.०४ | ६४१४४.९६ | |

वरील अनुक्रमांक उदा. ८,९,११,१३,१६,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२८,३२,३३ व ३४ या लेखाशिर्षात कोणत्याही रकमा जमा झाल्याचे दिसुन येत नाही. तरीही सदर लेखाशिर्षातुन र.रु. १६२२८.०० लक्ष इतकी मोठ्या प्रमाणात जमा तरतुद अपेक्षित धरली होती. यामुळे लेखाशिर्ष व अंतर्गत तपशिलावर बाबींचे स्पष्टीकरण सुस्पष्ट होणे आवश्यक आहे.

स्थानिक संस्था कर नियमान्वये दंड / शास्ती या लेखा शिर्षकात विभागाने मुळ अंदाजपत्रकात तरतुद र.रु. १२.०० लक्ष धरणेत आली होती, परंतु सदर लेखाशिर्षात मोठ्या प्रमाणात ७८६६.०० लक्ष इतकी रक्कम जमा झाली असुनही विभागाने सुधारीत अंदाजपत्रकातही तरतुद १२.०० लक्ष इतकीच करणेत आली. याबाबत विभागाने सदर लेखाशिर्षात मोठ्या प्रमाणात रकमा जमा होत असतांनाही मुळ अंदाजपत्रकात उत्पन्न गृहीत धरले जात नाही. सदर बाब ही उदा. आहे अशा अनेक बाबी आहे. तरी अशा बाबींबाबत विभागाने वेळीच दक्षत घेणे आवश्यक आहे जेनेकरून अर्थसंकल्प वास्तववादी होईल.

उपरोक्त विभागाचा अस्थापना (फक्त पगारावरील) खर्च ५००.०० लक्ष इतका असुनही (सदरचा विभाग महसुली उत्पन्नाचा ) विभागाने उत्पन्ची तरतुद मात्र फक्त १२.०० लक्ष इतकीत धरणेत आलेली होती, तसेच चालु वर्षात (सन २०२०-२१) मध्येही सदर लेखाशिर्षात फक्त ८.०० लक्ष तरतुद धरणेत आलेली आहे. सदर विभागाचा आस्थापना खर्च मात्र ५५०.०० लक्षच्या पुढे होणार आहे. सदरचा महसुली विभाग असतांना उत्पन्न व खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसुन येते.

उपरोक्त बाबींवरून अर्थसंकल्प तयर करतांना मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रकमा, थकबाकी रक्कम व त्यावर आधारीत चालु अर्थसंकल्पात जमा गृहीत न धरता केले आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, १९७१ नियम क्र. २६ (३) नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर आधारलेले असले पाहिजे. करांपासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठरावीक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मात्र मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरी पर्यंत मर्यादित असावेत. अथवा त्या वर्षाची मागणी, अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असावे. या बाबत विभागाने दक्षता घेणे आवश्यक आहे.

वा.ले.अ.सन २०१९-२०/6

## परिच्छेद क्र. २ :- अंदाजपत्रकीय तरतुद व खर्च आकडेवारी बाबत :-

वार्षिक लेख्यांची तपासणी केली असता मंजुर अंदाजपत्रकातील लेखाशिर्षानुसारच खर्च होणे आवश्यक होते. तथापि, अंदाजपत्रकातील काही लेखाशिर्षांची तरतुद व प्रत्यक्ष खर्च यामध्ये तफावत निदर्शनास आली आहे.

**सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्च.**

| अ.क्र. | खर्च बाजु लेखा शिर्ष | कोड नं. | तरतुद र.रू (लाखात) | खर्च रक्कम रूपये | उणे खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन आकस्मिक खर्च | २३१४ | १५.०० | १५४७५१७ | -४७५१७ |
| २ | माहिती व तंत्रज्ञान स्थायी आस्थापना | २३६६ | २०.०० | २१४२५३१ | -१४२५३१ |
| ३ | संगणकाचा वापर करणे | २३८० | ५.०० | ३४९६००० | -२९९६००० |
| ४ | एकत्रीत कर रिफंड न रिबेच /आकस्मिक खर्च | २३८१ | १०००.०० | १३७६२७४२५ | -३७६२७४२५ |
| ५ | अग्निशामक विभाग स्थायी आस्थापना | २३९१ | १०५०.०० | १०५५५४४७७ | -५५४४७७ |
| ६ | पथदिप देखभाल | २७०७ | १२६.०० | १४६२३३३९ | -२०२३३३९ |
| ७ | टेलिफोन खर्च | २३९९ | ४६.०० | ५८४९४९८ | -१२४९४९८ |
| ८ | पशुसंवर्धन यी आस्थापना | २४१५ | १०५.०० | १०५७०३३३ | -७०३३३ |
| ९ | मोकाट बेवारस कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे व पिसाळलेल्या नियंत्रण | २४०३ | १००.०० | १०६०४९६९ | -६०४९६९ |
| १० | डास निर्मुलन | २४३० | १०००.०० | १०७३१६१६६ | -७३१६१६६ |
| ११ | सार्व बांध.नाशिक सातपुर स्थायी आस्थापना | २४६७ | ११५.०० | १२१५८८८४ | -६५८८८४ |
| १२ | सार्व बांध. आकस्मिक खर्च | २४७० | ००.५० | ५२७६४ | -२७६४ |
| १३ | अतिक्रमण मुख्यालय स्थायी आस्थापना | २४८३ | २८५.०० | २८७८९३४४ | -२८९३४४ |
| १४ | अतिक्रमण नविन नाशिक स्थायी आस्थापना | २४८५ | १५.०० | १६०२२२७ | -१०२२२७ |
| १५ | अतिक्रमण आकस्मिक खर्च | २८०६ | ५०.०० | १०१५८०६८ | -५१५८०६८ |
| १६ | उद्यान विज बिले | २६९६ | ४५.०० | ४६९०३१६ | -१९०३१६ |
| १७ | तरणतलाव देखभाल दुरूस्ती | २७७७ | ११०.०० | १६५११५५४ | -५५११५५४ |
| १८ | जंतुनाशक खरेदी | २४२७ | ३०.०० | ४३१८४५७ | -१३१८४५७ |
| १९ | नविन परिभाषीक अंशदान निवृत्ती वेतन | ५०२० | २००.०० | ३४०४८५८५ | -१४०४८५८५ |
| २० | निवासी कर | २५४६ | ५५.०० | ५५७८१८६ | -७८१८६ |
| २१ | इतर जमाखर्ची | २५४७ | ३५०.०० | ५१४१७९२९ | -१६४१७९२९ |
| २२ | वस्तु व सेवा कर(cgst) | ५०२७ | ८०.०० | ९१७१६६० | -११७१६६० |
| २३ | वस्तु व सेवा कर(sgst) | ५०२८ | ८०.०० | ९१७१६६० | -११७१६६० |
| २४ | मागासवर्ग ५% भांडवली | २९६१ | ३९४.८० | ४०५३९४४९ | -१०५९४४९ |
| २५ | क्रिडा ५% भांडवली | २९६५ | १२.२२ | ६८२५६५४ | -५६०३६५४ |
| २६ | दिव्यांग ५% भांडवली | २९६७ | ६९.८१ | ८२५३०९२ | -१२७२०९२ |
| २७ | पा. पु. व्यवस्थापन ना.पश्चि. स्थायी आस्थापना | २६३९ | १९१.०० | २४५९५७०३ | -५४९५७०३ |
| २८ | पंपिग स्टेशन विज बिले व ऑईल खरेदी | २५६६ | ४०५७.०० | ४२२०३८६२१ | -१६३३८६२१ |
| २९ | पाणी पुरवठा व्यवस्थापन शासकीय पाणी बिले | २५६७ | १०७८.०० | १४९८५७१३३ | -४२०५७१३३ |
| ३० | मलनिःसारण व्यवस्थापन देखभाल व दुरूस्ती | २५७० | १५६.०० | १६९६५५५७ | -१३६५५५७ |
| ३१ | महिलांसाठी ५% भांडवली | २९६३ | २९.१० | ७४११२१० | -४५०१२१० |
| ३२ | शैक्षणिक सुविधा पुरविणे | २५१६ | ७०.०० | १६५७०९१९ | -९५७०९१९ |
| | | **एकुण** | **१०९४०** | **१२८००५९२२७** | **-१८६०१६२२७** |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ ते १०४ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्याअन्वये सदर खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक होते.

वरील लेखाशिर्षाचे खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झाल्याचे दिसुन येत आहे. रक्कम रूपये १८,६०,१६,२२७/- इतका खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेली आहे.

सुधारीत अर्थसंकल्पापेक्षा वेगवेगळया लेखाशिर्षकांतर्गत एकूण रक्कम रूपये १८,६०,१६,२२७/- एवढा जास्त खर्च झाल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८६ व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम २८ नुसार अर्थसंकल्पीय शिर्षकाखाली तरतुद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही. सबब अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रूपये १८,६०,१६,२२७/- हा जादा झालेला खर्च दिसतो. सदरच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ ते १०४ नुसार सदर कमी व जादा खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक होते.

**परिच्छेद ३ :- उपर्जित तत्वावर आधारित- दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी बाबत:-**

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.लेखासं-१०/२००४/७१ प्रक्र./०४ निवि-३ दिनांक ६/७/२००५ नुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिनांक १/४/२००५ पासुन उपर्जित पध्दतीवर आधारित द्वीनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करावयाची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही सत्वर पूर्ण करणेकडे लेखा विभागाने पाठपुरावा करणे आवश्यक होते. केंद्र व राज्य शासनाकडुन पुरस्कृत (स्मार्ट सिटी अमृत स्वच्छ भारत योजना, JNNURM) उपक्रम राबविण्यासाठी निधी उपलब्धते बाबत सदरची बाब आवश्यक अहर्ता असल्याने द्विनोंद लेखापध्दती बंधनकारक आहे. तरी सदर कामकाजाबाबतचा प्रगती अहवाल देण्यात यावा. केंद्र पुरस्कृत निधी मनपास प्राप्त होणेसाठी (अमृत, JNNURM, स्मार्ट सिटी इ.) साठी सदरची बाब महत्वाची असल्याने याबाबत द्विनोंद लेखा पध्दतीचा ताळेबंद झालेला दिसुन येत नाही.

व्दिनोंद लेखापध्दती नुसार प्रत्येक आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, जमा खर्च लेखे तयार होणे गरजेचे आहे. याबाबत विभागाने वार्षिक ताळेबंद वेळीच पुर्ण करण्याची दक्षता घेणेत यावी. महापालिकेत उपार्जित तत्वावरील व्दिनोंद लेखापध्दतीवर आधारीत दिनांक ३१/०३/२०२० अखेरचा ताळेबंद तयार करुन त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असतांना लेखापरिक्षण कालावधी पर्यंत अशी कार्यवाही केलेली नाही.

**परिच्छेद क्र.४ :- शासन निर्देशाप्रमाणे २१% राखीव खर्च बाबी व वृक्ष प्राधिकरण निधी बाबत.**

४.१ सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात २१% राखीव खर्च बाबींवरील खर्च स्वतंत्र नमुद करून महानगरपालिकेने अर्थसंकल्पीय केलेल्या तरतुदी व सदर योजनेकामी केलेला महसुली खर्च व भांडवली खर्च किती करणेत आला या बाबत तक्त्यात माहिती पुराव्यासह उपलब्ध करून देणे बाबत कळविणेत आले होते तथापि विभागाने कोणतीही माहिती उपलब्ध करून न दिल्याने त्या बाबतची खात्री करता आली नाही.

४.२ परीपत्रक, नगरविकास विभाग क्र. संकीर्ण २०१०/ प्र.क्र. १४६ दि. ३०.१०.२०१० व नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/ प्र.क्र. ११८/ नवि-२० दि. २८/१०/२०१५ अन्वये अपंग कल्याणासाठी ३% इतका खर्च करणेचे निर्देश आहे. परंतु विभागाने सदर योजनेस ५% इतका खर्च लेखाशिर्षात नमुद आहे, त्या बाबतचा मा. शासन निर्णय उपलब्ध करून देणेत आला नसल्याने त्या बाबतची पडताळणी करता आली नाही.

४.३ महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये झाडे तोडण्याचे नियमन करून राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासाठी अधिक चांगली तरतुद करण्यासाठी आणि त्या क्षेत्रात समुचित प्रमाणात नविन झाडे लावण्याची तरतुद करणे अंतर्भूत करण्यात आलेले आहे. या अधिनियमातील कलम २ (क) मध्ये झाडांचे जतन करणे म्हणजे केवळ नविन झाडे जिवंत राहण्यासाठी आणि त्यांच्या संख्येत वाढ होणे करीता इतर कामे करणे असे स्पष्ट

नमुद केलेले आहे. तसेच प्रकरण सहा कलम १५ अन्वये एकूण जमा रकमेच्या ½ % रकमेची वृक्ष प्राधिकरण खाती तरतुद करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. तथापि, वृक्ष निधी अंशदान खाती मुळ अंदाजपत्रकात व सुधारीत अंदाजत्रकात किती तरतुद केलेली आहे या बाबत विभागाने लेखाशिर्ष व संगणककोड क्रमांकासह माहिती उपलब्ध करून देणेत आली नसल्याने त्या बाबतची पडताळणी करता आली नाही.

४.४ नाशिक महानगरपालिकेचा बांधील खर्च किती आहे, तसेच सदर खर्चाच्या आस्थापना खर्च किती टक्के आहे, याबाबत माहितीसह आकडेवारी उपलब्ध करून देणेत आली नाही.

**परिच्छेद क्र.५ :- नगरसेवक स्वेच्छा निधीबाबत.**

नगरसेवक निधी या शिर्षाखाली वित्तीय वष्र २०१३-१४ मध्ये सुधारीत अंदाजपत्रकात २५४ लक्ष रूपयाची तरतुद केली होती. प्रत्यक्ष खर्च र.रू. १३.५९ लक्ष झाला आहे. वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये ५६५.५० लक्ष तरतुदीपैकी प्रत्यक्ष खर्च र.रू. ५.२३ लक्ष झाला आहे. सन २०१५-१६ मध्ये र. रू. ७७३.३० लक्ष तरतुदीपैकी र.रू. १.९३ लक्ष खर्च झाला आहे. वित्तीय वर्ष सन २०१६-१७ मध्ये र. रू. ७२२.९० लक्ष तरतुदीपैकी खर्च निरंक झाला असुन सन २०१७-१८ मध्ये र.रू. १०९४.०० तरतुदीपैकी सन २०१९-२० मधिल खर्च नमुद करावा. निरंक झाला आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात र.रू. १५०४.० लख तरतुद करण्यात आली असुन प्रत्यक्ष खर्च निरंक झाला आहे. नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक AMC/१४२००/२२६४/ प्र.क्र.१४४, नवि-२४ दिनांक २८/६/२००१ च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे खर्च आवश्यक त्या बाबींवर निकडीप्रमाणे करणे गरजेचे आहे.

**परिच्छेद क्र.६ :- अवसायक श्री. बालाजी को.ऑप. बँक व अवसायक श्री. श्रीराम को.ऑप, बँक यांचेकडील मुदत ठेवींबाबत.**

नाशिक महानगरपालिकेने विविध निधीतील मुदतठेवी र. रू. ५३.६६ लक्ष श्री. बालाजी को.ऑप.बँकेत गुंतवणूक करण्यात आली होती. तसेच श्रीराम सहकारी बँकेत एकूण र. रू. ११.३४ कोटी मुदतठेवी म्हणून ठेवण्यात आलेल्या आहेत. यापैकी श्री. बालाजी बँकेकडील र. रू. ५३.६६ लक्ष वसुल झाले बाबत वित्त व लेखा अधिकारी यांचे पत्र क्र. लेखा/वशि/६८३/२०१९ दि. १/७/२०१९ अन्वये कळविले आहे. तथापि, श्रीराम सहकारी बँकेचे पैसे अद्यापही मनपास प्राप्त झालेले नाहीत. तरी विषयांकीत प्रकरणी व्याजासह पैसे मनपास प्राप्त होण्यासाठी मा. सहकार आयुक्त तथा निबंधक, सहाकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, वा नॅशनल कंझ्युमर फोरम यांचेकडे प्रकरण दाखल करून सदरचे पैसे व्याजासह परत मिळण्यासाठी काय प्रयत्न केले त्याचा खुलासा करावा.

**आक्षेप परिच्छेद क्र. ७ :- अग्निसुरक्षा निधी ताळमेळ व खर्चाबाबत :-**

१. महाराष्ट्र आगप्रतिबंध आणि जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००७ प्रकरण ७ कलम २५ (१) आग सुरक्षा निधी या नावाने संबोधला जाणारा एक विशेष निधी स्थापन करून त्यात या अधिनियमान्वये बसविण्यात व गोळा करण्यात आलेली फी त्या मध्ये जमा करण्यात येईल या प्रमाणे तरतुद आहे. यानुसार मनपा कडून मालमत्ता करात अग्निनिवारण करापोटी (कोड नं ११४) सर्वसाधरण कराच्या २ टक्के इतकी रक्कम आकारली जाते या व्यतिरीक्त (कोड नं २३८) अग्निशामक सुरक्षा निधी (आग्निशमन दाखला फी, तपासणी फी, नुतणीकरण, तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्था आगविझविण्याची फी बिल्डिंग परवाना साठी NOC ) इ. पोटी आकारण्यात येणारे शुल्क जमा केले जाते.

२. कलम २५ (२) संबंधित प्रधिकरणाच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये या विशेष निधीचा तपशिल देण्यात येईल आणि संबंधित प्रधिकरणाला लागु असलेल्या सदर कायद्यामध्ये किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या नियमामध्ये व आदेशामध्ये विहित केले असेल अशा कार्यपध्दतीनुसार या निधीचे लेखे ठेवण्यात येतील अशी तरतुद आहे. तथापि यानुसार लेखे पडताळणीसाठी उपलब्ध झाले नाहीत.

३. कलम २५ (२) नुसार या अधिनियमाच्या तरतुदींना आधिन राहून आणि राज्यशासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेषत: आदेशाला आधिन राहून सर्वसाधारणत: अग्निशामक पथक सेवाचालविण्यासाठी ज्यात (अग्निशामक अधिकारी कर्मचारींचे वेतन आणी भत्ते व इतर अनुषंगिाक खर्च यांचा समावेश असेल) आणी विशेषत: प्राधिकरणाच्या हद्दितील अथवा

हद्दिबाहेर कोणत्याही जमिनीवर किंवा कोणत्याही इमारतीस आगीस प्रतिबंध करण्याचा किंवा आगविझविण्याच्या प्रयोजनार्थ आत्याधुनिक साधन सामुग्री व उपकरणे पुरविण्यासाठी यानिधीतिल रक्कम वापरण्यात येईल आणि या अधिनियमामध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी ती वापरता येणार नाही याप्रमाणे तरतुद आहे. तथापि याप्रमाणे कार्यवाही होत नाही मालमत्ता करातुन मिळणारा २ टक्के अग्निनिवारण करीता (कोड नं ११४) रक्कम सर्वसाधारण निधीमध्येच ठेवलेली आहे, सदर रक्कम आगसुरक्षा निधीत दरमहा वर्ग होणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात रक्कम रूपये ९,४४,६१,३६१.०९/- (कोड नं ११४) आगसुरक्षा निधीत जमा झालेली दिसुन येते.

४. अग्निशामक विभागाचा आस्थापना खर्चासह इतर सर्व खर्च सर्वसाधारण निधीतुन (जनरलफंड) केला जातो सदर बाब अनियमित असल्याने याबाबत विभागाने उपरोक्त अधिनियमान्वये लेखे ठेवणे व त्याबाबत उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र.८ :- सरकारी शिक्षण कर, रोजगार हमी कर, निवासी कर, शासकीय कोषागारात सन २०१९-२० मध्ये भरणा केले बाबतचा तपशिल.**

संदर्भ :- जा.क्र.मुलेप/वशि/डेस्क-६/३८/२० दि. २३/०४/२०२०.

महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर (उपकर) अधिनियम १९६२ मधील तरतुदीनुसार शिक्षण कर व रोजगार हमी कर, निवासी कर मालमत्ता धारकांकडून आकारणी होऊन मनपाने सदरच्या कराच्या रकमा वेळोवळी वसुल करून २% रिबीटह रक्कम वजा करून उर्वरित रक्कम अधिनियमातील कलम १७ नुसार सत्वर व विहीत मुदतीत शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे. याबाबत विभागाने अद्याप पावेतो माहिती उपलब्ध करून दिली नाही.

**परिच्छेद क्र.९ :- स्थानिक संस्था कर परतावा रकमांच्या नोंदी व जमा रकमेच्या नोंदी अभिलेख्यात घेणे बाबत.**

स्थानिक संस्था कर विभागाकडील सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील स्थानिक संस्था कर वसुली बाबत कर विभागाचे पत्र जा.क्र./स्था.सं.कर/वशि/कार्या-८/१०३/२० दि. २०/१०/२०२० नुसार पुढील प्रमाणे वसुल रकमा मनपाकडे जमा केलेल्या आहेत.

| अ.क्र. | महिना/वर्ष | स्थानिक संस्था कर वसुली र. रू. |
|---|---|---|
| १ | एप्रिल २०१९ | ७४०१९८ |
| २ | मे २०१९ | २७६६३३७ |
| ३ | जुन २०१९ | १६५७९७७ |
| ४ | जूलै २०१ | ३२८२४९४ |
| ५ | ऑगष्ट २०१९ | २०९५९११ |
| ६ | सप्टेंबर २०१९ | ३५०१२७६ |
| ७ | ऑक्टोंबर २०१९ | ४२०७५४९ |
| ८ | नोव्हेंबर २०१९ | २१११०१२ |
| ९ | डिसेंबर २०१९ | १६८०६४५ |
| १० | जानेवारी २०२० | १८१४९७१ |
| ११ | फेब्रुवारी २०२० | १९८४४९६ |
| १२ | मार्च २०२० | १८१७०४३ |
| | एकूण | २७६५९९०९ |

स्थानिक संस्था कराचे स्वतंत्र डे बुक तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाही. सर्वसाधारण निधीच्या डे बुकात दिनांक ४ मे २०२० रोजी र. रू. २,४५,४३,९७१/- स्थानिक संस्था करापोटी जमा रक्कम एकाच तारखेला दाखविलेली आहे. सदर बाब अनियमित आहे. ज्या तारखेस रकमा मनपा खजिन्यात भरणा करण्यात आल्या त्याच तारखेस त्याची नोंद डे बुकात घेणे आवश्यक आहे. र. रू. ३१,१५,९३८/- इतकी रक्कम जमा असल्याची नोंद आढळून आलेली नाही. सदर बाब गंभीर

स्वरूपाची आहे. स्थानिक संस्था कराचे स्वतंत्र डे बुक ठेवलेले नाही तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाही.

विविध विभागांकडून करांच्या अनुषंगाने परतावा रक्कम मंजूर करण्यात येत असतात. सबंधीत परतावा मंजूर करण्याच्या प्राधिकाऱ्याने रक्कम दुबार प्रदान होत नाही याची खात्री करण्याची जबाबदारी परतावा मंजूर करणाऱ्या प्राधिकरणाची आहे. तथापि, लेखा शाखेमार्फत ती प्रदान होत असतांना सदरची रक्कम महानगरपालिकेच्या ज्या दिवसांच्या लेख्यांमध्ये रितसर जमा आहे त्यासमोर होणे आवश्यक आहे. तथापि, नियम ३२ व ४४ अंतर्गत स्थानिक संस्था कर परताव्या बाबतच्या नोंदी संबंधीत लेख्यांमध्ये घेतल्याचे दिसुन आले नाही. तरी विभागाने याबाबत खुलासा करावा.

**परिच्छेद क्र.१० :- सन २०१९-२० या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाकडील प्रलंबीत निधी उपयोगिता प्रमाण पत्राबाबत.**

वित्त व लेखा विभागाने सन २०१९-२० या वित्तीय वर्षात मनपा सर्वसाधारण निधी मधुन शिक्षण विभागास रकमा हस्तांतरीत केलेल्या आहेत. र. रू. ४८,४२,०६,९३९/- इतकी रक्कम हस्तांरीत केल्याचे दिसुन येते. सदर रकमेच्या विनियोगाबाबत वित्त व लेखा विभागाने खात्री करणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाचा जमा व खर्चासाठी लेखा शाखेने स्वतंत्र डे-बुक परिरक्षीत केलेले नाही. यामुळे शिक्षण विभागाकडे वितरीत केलेल्या रकमा व शिक्षण विभागासाठी प्राप्त झालेले अनुदान, इतर जमा रकमांचे तपशिल उपलब्ध झालेले नाहीत. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शिक्षकांच्या डिसी.पी.एस. बाबत वित्तीय वर्ष २०१९-२० मध्ये रक्कम वर्ग झालेबाबत लेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. तसेच शिक्षकांच्या डिसी.पी.एस. बाबत कोणतेही लेखे अद्यावत ठेवलेले नाहीत.

**परिच्छेद क्र.११ :- सन २०१८-१९ मधील विवाह नोंदणी शोधणावळ फी बाबत.**

**संदर्भ :- जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क-६/३९/२० दि. २३/०४/२०२०.**

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम १९९९ चे नियम १२ नुसार निबंधाकडे आलेल्या सर्व फी ची रक्कम विहीत मुदतीत मा. महाराष्ट्र शासनाकडे कोषागारात जमा करणे आवश्यक आहे. सन २०१९-२० पावेतो शासनाकडे किती रक्कम वर्ग करण्यात आली याबाबत अद्याप पावेतो माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.१२ :- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर निधीच्या विनियोगाबाबत व स्टँप रिसीट व उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे बाबत.**

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण/११९८/प्र.क्र.३०/नवि-४/१ जुन २०१९ अन्वये अखर्चित निधीच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. अखर्चित निधी दि. ३० सप्टेंबर २०१९ अखेर खर्च न झाल्यास शासनास जमा करणे बाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. दि. १४/७/२०२० अखेर खालील तपशिलाप्रमाणे निधी अखर्चित आहे. वित्त विभागाने संबंधीत विभागाचे लक्ष वेधून उचित कार्यवाही करावी.

| अ.क्र. | योजनेचे नांव | शिल्लक रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | नाविन्यपूर्ण योजना (निलगिरी बाग ॲटो मायसेशन) | १०.३३ लक्ष |
| २ | दलित वस्ती | १३३४.५९ लक्ष |
| ३ | दलितेतर वस्ती सुधारणा योजना | २८१.४४ लक्ष |
| ४ | पर्यटन विकास योजना | ७५ लक्ष |
| ५ | इतर नाविन्यपूर्ण योजना | १३७.९६ लक्ष |
| ६ | आमदार निधी | २६.८५ लक्ष |
| ७ | व्यायाम शाळा अनुदान | २.१२ लक्ष |
| | एकुण रक्कम रुपये | १,८६८.२९ लक्ष |

महानगरपालिकेस मुलभूत सोईसुविधा, एल.बी.टी. अनुदान अल्पसंख्यांक योजना, नगरोत्थान योजना, अमृत योजना, नागरी दलित वस्ती सुधार योजना, रस्ता अनुदान, स्मार्ट सिटी केंद्र-राज्य हिस्सा अनुदान व प्रशासकीय कार्यालयीन अनुदान. अमृत योजना अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अनुदान वितरीत करण्यात आलेली आहेत. उपआयुक्त (प्रकल्प)/संबंधित कार्यकारी विभाग यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून वित्त विभागाच्या संग्रही ठेवणे आवश्यक आहे.

**<u>परिच्छेद क्र.</u>१३ :- निवृत्ती वेतन निधी.**

सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये र. रू. १००,००,००,०००/- लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली असुन, झालेला खर्च र. रू. ८६,९७,९१,३०८/- लक्ष इतका झालेला आहे. सहाय्यक आयुक्त (प्र.) व उपमुख्य लेखाअधिकारी यांनी याबाबत ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

**<u>परिच्छेद क्र.</u>१४ :- आस्थापना खर्चा बाबत.**

वित्तीय वर्ष २०१९-२० मध्ये आस्थापना खर्च ३०.७३% असल्याचे लेखा विभागाचे पत्र क्र. मनपा/लेखा/४३६/२०१९ दि. ४/५/२०१९ अन्वये कळविणेत आलेले आहे. मनपाने आस्थापना खर्च नियंत्रणात राहाण्यासाठी स्वत:च्या उत्पन्नाची (महसुली जमांबाबत) अर्थसंकल्पात दर्शविलेल्या उदिष्टनिहाय रकमा जमा होण्या बाबत प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. याशिवाय थकबाकीच्या रकमांच्या वसुली बाबतही प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. तसेच आस्थापना विषयक खर्चामध्ये काटकसरीचे धोरणाचा यापुढेही खर्च नियंत्रित करणेसाठी अवलंब करणे आवश्यक आहे.

**<u>परिच्छेद क्र.</u>१५ :- नाशिक महानगरपालिका कर्जाच्या दायित्वा बाबत**

नाशिक महानगरपालिकेने सिंहस्थ कुंभ मेळयाकरीता नाशिक मनपा हिस्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र कडून र.रू. ९५०० लक्ष इतके कर्ज दि. १६/५/२०१५ रोजी घेतले होते. मा. स्थायी समिती ठराव क्र. १०३ दि. २१/९/२०१८ व मा. आयुक्त यांचे आदेश क्र. मनपा/आस्वीस/३७४/२०१८ दि. २/१/२०१८ अन्वये कर्जाची परतफेड केलेली आहे. तसेच जेएनएनयुआरएम अंतग्रत घरकुल योजनेकरीता हुडकोकडून घेतलेले र. रू. ३५०० लक्ष कर्जही उक्त ठरावान्वये व आदशान्वये परत फेड केल्याने सद्यस्थितीत या दोन्हीही कर्जाचे दायित्वे निरंक आहेत.

**<u>परिच्छेद क्र.</u>१६ :- वेतन देयके तपासणी बाबत.**

विविध विभागांकडून प्राप्त होणारी वेतन देयके ही लेखा शाखेत प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी होणे व त्याअनुषंगाने अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे. प्रशासन, मिळकत, तसेच संबंधीत विभाग प्रमुखांकडून प्राप्त होणारे अनुक्रमे सदनिका वाटप, प्रशासकीय शास्ती, वेतननिश्चिती, निवृत्ती वेतन वसुली, भ. नि. नि. अग्रीम मंजूरी तसेच घरबांधणे व इतर अग्रीम मंजूरी आदेश यांची संगणकीय वेतन प्रणालीमध्ये वेळीच नोंद होणे आवश्यक आहे. त्या अन्वये मनपा निवास स्थानांची अनुज्ञप्ती शुल्क वसुली, विविध अग्रीमे वसुली, वेतन निश्चितीची अंमलबजावणी व दिलेल्या शास्तीची खात्री करण्यासाठी अभिलेख अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

**<u>परिच्छेद क्र.</u>१७ :- बँक ऑफ महाराष्ट्रने मे. एमआयसी कंपनीस दिलेल्या बँक गॅरंटीच्या अनुषंगाने परस्पर वसुल केलेल्या कमिशन बाबत.**

विद्युत विभागाचे पत्र क्र.मनपा/विद्युत/७५७/२०१३ दि. ३०/१०/२०१३ अन्वये र. रू. ८० कोटीची बँक गॅरंटी देण्यात आलेली आहे. बँक ऑफ महाराष्ट्र यांनी सदरच्या कमिशनपोटी वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये र.रू. ४५.८० लक्ष सन २०१६-१७ मध्ये र. रू. ४५.८० लक्ष व सन २०१७-१८ मध्ये र. रू. ४७.२० लक्ष इतके कमिशन वसुल केलेले आहे. याबाबत सक्षम प्राधिकरणास सदरची बाब अवगत करण्यात यावी, व याबाबत लेखा विभागाने बँकेस कमिशन वसुल करू नये असे दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही अवगत करावी. याप्रमाणे लेखाशाखेस निर्देश देण्यात आलेले होते. तथापी विभागाने पुर्तता केलेली नाही. विभागाने सन २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षात कमिशनपोटी बँकेस किती रक्कम दिलेली आहे किंवा काय या बाबतचे लेखे मागणी करुनही उपलब्धकरुन दिलेले नाहीत.

**<u>परिच्छेद क्र.</u>१८ :- मनपा कंत्राटदारांचे भविष्य निर्वाह निधी कपातीचे अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

मनपा कंत्राटदारांचे भविष्य निर्वाह निधी कपातीचे अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत मा. आयुक्त यांचे परिपत्रक क्र.लेखा/वशि/५१९/२०१९ दि. २३/५/२०१९ अन्वये कत्राटदारचे भविष्य निर्वाह

निधी कपातीचे अभिलेखे व कपातीचा तपशिल वेळीच संबंधीत कार्यालयाला सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सन २०११ ते २०१६-१७ या कालावधीतील १०३ कंत्राटदारांपैकी २२ कंत्राटदारांकडील अभिलेखे व कपातीच्या तपशिलाबाबत माहिती मिळाली आहे. ८१ कंत्राटदारांची माहिती सादर होणे प्रलंबीत आहे. भविष्य निधी कार्यालयाकडून या प्रकरणी मनपावर दंडनीय कार्यवाही होऊ शकते. त्यासाठी उचित कार्यवाही सत्वर करणे गरजेचे आहे.

**परिच्छेद क्र १९ :- जमा रक्कमा ताळमेळा बाबत :-**

मनपाच्या अधिनस्त कार्यरत असलेले विविध विभागप्रमुख व विभागीय कार्यालय स्तरावर नागरीकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबत शुल्क आकारणीपोटी रक्कम जमा होत असतात. सर्व विभागांकडून अशा प्रकारच्या जमा रकमा ऑन लाईन प्रणाली किंवा पावती पुस्तकाद्वारे जमा करून मनपा खजिन्यामध्ये भरणा केल्या जातात. अशा भरणा केलेल्या रकमांच्या आधारे लेखा शाखेत लेखे तयार होत असतात. अशा जमा रकमांबाबत विभाग प्रमुखांनी मनपाच्या लेख्यांसोबत दरमहा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही विभाग प्रमुखांकडून होत नसल्याचे दिसुन येते. वित्त व लेखा विभागाने याबाबत सर्वच विभाग प्रमुखांना निर्देश देऊन त्यांच्याकडील लेखा शिर्षाच्या जमा रक्कमा ताळमेळ बाबत निर्देश देणे आवश्यक आहे. याशिवाय विभाग प्रमुखांनीही छपाई विभागाकडून वाटप झालेले पावती पुस्तके, त्याचा झालेला वापर व त्या अनुषंगाने जमा झालेल्या रक्कमा यांचा ताळमेळ पुर्ण करणे आवश्यक आहे, तथापि, असा ताळमेळ मनपामध्ये होत नसल्याचे दिसुन येते. सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्याकडील जमा लेखा शिर्ष अंतग्रत जमा होणाऱ्या रकमांचे द्विप्रतीत विवरणपत्र तयार करून लेखा शाखेकडे पडताळणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. लेखा विभागाने जमा विवरणपत्र पडताळून विभागास देणे आवश्यक आहे. लेखा विभागाने सत्र जमा विभागागांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे. तसेच विभाग स्तरावरील कोषागार/खजिना विभागाचे लेखे मुख्यालयात अंतग्रत वेळीच होणे अपेक्षित असुन त्याबाबतही ताळमेळ होणे आवश्यक आहे. व दैनंदिन सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित करणे गरजेचे आहे.

**परिच्छेद क्र २० :- सुरक्षा अनामत लेख्यांच्या अनियमिततेबाबत.:- सन 2018-2019**

संदर्भ :- १) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क्-६/१२९/१९ दि. १८/०४/२०१९
२) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क्-६/४४१/१९ दि. ०३/०५/२०१९

वार्षीक लेखे तपासणी कामी सुरक्षा अनामत अभिलेख्यांची पडताळणी केली असता खालील अनियमित बाबी आढळून आल्या. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम १९० मधील तरतुदीनुसार लेखे ठेवलेले नाही. नियमानुसार तीन वर्षानंतर सुरक्षा अनामत पक्क्यासदरी जमा करून स्वतंत्र लेखे ठेवणे आवश्यक आहे. तथापी अशी कार्यवाही झालेली नाही.

१. सुरक्षा अनामत डिफेक्टलायबिलीटी कालावधी संपल्यानंतर तीन वर्षांनी खालील रक्कमा पक्क्या सदरी जमा केल्याचे दिसुन येत नाही. तसेच त्याचे स्वतंत्र लेखे अद्ययावत प्रमाणीत करणेत आलेले नाही, उदाहरणादाखल खालील तपशिल देण्यात आलेला आहे.

| अ. क्र | मक्तेदाराचेनांव | पावती क्र. व दिनांक | रक्कम रुपये | कामाचा पुर्णत्वाचा दाखला | डिफेक्टीव्ह लायबिलीटी कालावधी | पक्क्या सदरीचा कालावधी दिनांक | पक्क्या सदरीतुन दिल्याचे व्हौऊचर क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एशियन हौडोलिक्स | 2479/65 6.12.14 | 25000/- | 12/2/2014 | १२ महीने | 05/12/2017 | 9/24.4.2018 |
| २ | एशियन हौडोलिक्स | 2629/25 20.10.15 | 9759/- | 12/2/2014 | 12 महिने | 05/12/2017 | 9/24.4.2018 |
| ३ | पंढरी इन्फ्रा. प्रा.ली | 1796/67 27/6/2011 | 20209/- | 30/9/2014 | 36 महिने | 29/09/2017 | 24/4.4.2018 |
| ४ | पंढरी इन्फ्रा. प्रा.ली | 2513/57 24/11/2014 | 74877/- | 30/9/2014 | 36 महिने | 29/09/2017 | 24/4.4.2018 |
| ५ | रियाबल इले. | २७19/71 26/8/2016 | 36755/- | 25/2/2017 | 12 महिने | 24/02/2018 | 6/24.4.2018 |
| ६ | रियाबल इले. | 2840/80 21/5/2017 | 36753/- | 25/2/2017 | 12 महिने | 24/02/2018 | 6/24.4.2018 |
| ७ | गौरव कन्स्ट्र. | 2730/92 11/8/2016 | 26315/- | 7/7/2016 | 12 महिने | 06/07/2017 | 7/24.4/2018 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | गौरव कन्स्ट्र. | 2765/81 11/8/2016 | 12275/- | 7/7/2016 | 12 महिने | 06/07/2017 | 7/24.4/2018 |
| ९ | गौरव कन्स्ट्र. | 2728/92 8/8/2016 | 25580/- | 20/6/2016 | 12 महिने | 19/6/2017 | 7/24.4/2018 |
| १० | गौरव कन्स्ट्र. | 2745/21 11/8/2016 | 14445/- | 12/9/2016 | 12 महिने | 11/09/2017 | 7/24.4/2018 |
| ११ | गौरव कन्स्ट्र. | 2727/71 4/8/2016 | 4180/-- | 20/1/2016 | 12 महिने | 19/01/2017 | 7/24.4/2018 |
| १२ | गौरव कन्स्ट्र. | 2584/08 7/4/2015 | 5000/- | 7/10/2015 | 12 महिने | 06/10/2016 | 7/24.4/2018 |
| १३ | गौरव कन्स्ट्र. | 2662/57 16/2/2016 | 4883/- | 7/10/2015 | 12 महिने | 06/10/2016 | 7/24.4/2018 |
| १४ | गौरव कन्स्ट्र. | 2584/06 7/4/2015 | 5000/- | 6/10/2015 | 12 महिने | 05/10/2016 | 7/24.4/2018 |
| १५ | गौरव कन्स्ट्र. | 2727/05 3/8/2016 | 4921/- | 6/10/2015 | 12 महिने | 05/10/2016 | 7/24.4/2018 |
| १६ | गौरव कन्स्ट्र. | 2584/14 7/4/2015 | 5000/- | 6/10/2015 | 12 महिने | 05/10/2016 | 7/24.4/2018 |
| १७ | गौरव कन्स्ट्र. | 2727/08 3/8/8/2016 | 4652/- | 6/10/2015 | 12 महिने | 05/10/2016 | 7/24.4/2018 |
| १८ | गौरव कन्स्ट्र. | 2584/9 7/4/2015 | 5000/- | 6/10/2015 | 12 महिने | 05/10/2016 | 7/24.4/2018 |
| १९ | गौरव कन्स्ट्र. | 2727/04 3/8/2016 | 4918/- | 6/10/2015 | 12 महिने | 05/10/2016 | 7/24.4/2018 |
| २० | गौरव कन्स्ट्र. | 2584/11 7/4/2015 | 5000/- | 19/9/2015 | 12 महिने | 18/06/2016 | 7/24.4/2018 |
| २१ | गौरव कन्स्ट्र. | 2724/62 26/7/2016 | 2447/- | 26/7/2016 | 12 महिने | 25/07/2017 | 7/24.4/2018 |
| २२ | गौरव कन्स्ट्र. | 2784/07 7/4/2015 | 5000/- | 18/9/2015 | 12 महिने | 17/09/2016 | 7/24.4/2018 |
| २३ | गौरव कन्स्ट्र. | 2724/63 26/7/2016 | 2198/- | 18/9/2015 | 12 महिने | 17/09/2016 | 7/24.4/2018 |
| २४ | गौरव कन्स्ट्र. | 2584/13 7/4/2015 | 5000/- | 28/5/2015 | 12 महिने | 27/5/2016 | 7/24.4/2018 |
| २५ | गौरव कन्स्ट्र. | 2657/94 2/11/2015 | 4747/- | 28/5/2015 | 12 महिने | 27/6/2016 | 7/24.4/2018 |
| २६ | गौरव कन्स्ट्र. | 2441/69 23/5/2014 | 21871/- | 6/3/2014 | 12 महिने | 5/3/2015 | 7/24.4/2018 |
| २७ | गौरव कन्स्ट्र. | 2407/31 1/7/2014 | 22708/- | 5/3/2014 | 12 महिने | 4/3/2015 | 7/24.4/2018 |

- विविध कामाच्या संदर्भात सुरक्षा अनामत जमा होत असते सदर सुरक्षा अनामत मुदतबाह्य रक्कमा पक्क्या सदरी जमा करणे आवश्यक होते परंतु अशा प्रकारचे लेखे लेखाविभागाने ठेवलेले दिसून येत नाही.
- उपरोक्त नमुद रक्कमा पक्क्या सदरीनंतर दिल्याचे दिसून येते. परंतु सदर रक्कमा देतांना सक्षम प्राधीकरणाची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

2) सुरक्षा अनामत रक्कमांच्या परतफेडीच्या नोंदी न घेतल्याचा उदा. तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | मकातेदाराचे नाव | पावती क्र. दिनांक | व्हौचर क्र. व दिनांक | र.रु | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.शेख एन शमशोनद्दीन | 2890/81 | 16/02/2018 | 3930 | 1050 |
| २ | निहाय जे शेख | 2890/82 | 16/02/2018 | 4066 | 1050 |

- सुरक्षा अनामत परतफेड केल्या मात्र त्याच्या नोंदी सदर खतावणी रजिष्ट्रवर घेण्यात आलेल्या नाही . उदा. दाखल वरील प्रकरणे दर्शविले आहे. परंतु अशा सर्वच प्रकारच्या परतफेडीच्या नोंद घेण्यात आलेले नाही.
- परतफेडीच्या नोंदी न घेतल्यामुळे सदर रक्कमा दुबार देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. विविध कामोचे निविदेच्या वेळी मकातेदाराकडून ऑनलाईन बयाना व सुरक्षा अनामत रक्कमा घेतल्या जातात व त्याच्या परतफेडीही केल्या जातात याबाबतच्या एकुण किती रक्कमा जमा आहे व किती रक्कमा परतफेड केल्या याबाबत लेखा विभागाने कोणतेही प्रकारचे लेखे अद्ययावत ठेवलेले नाही.

४. सुरक्षा अनामत एकुण जमा किती आहे,परतफेड किती व शिल्लक किती आहे याबाबतचा गोषवारा तयार केलेला नाही.

५. पक्क्या सदरी रक्कमांच्या नोंदी स्वतंत्र घेणेत आलेले नाही. तसेच त्याची परतफेड करतांना सक्षम प्राधीकरणाची मान्यताही घेण्यात आलेली दिसून येत नाही. विभागाने अनुपाल सादर केले नसल्याने उपरोक्त बाबींचा पुर्ततेसह अनुपालन सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे

**आक्षेप परिच्छेद क्र.२१ :- भविष्य निर्वाह निधी लेख्यांतील अनियमितते बाबत.**

सन 2019-2020 या वित्तीय वर्षात कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीचे लेखे (व्हौऊचर नस्ती, परतावा व नापरतावा नस्ती, सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या नस्ती इ. ) लेखाविभागाने उपलब्ध करून देण्यात आलेले लेख्यांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अनियमित बाबी आढळून आल्या आहे.

1. विभागाने प्रमाणीत ब्रॉडशिट व लेजर, डे-बुक इ. लेखे पडताळणीसाठी उपलब्ध करून दिले नाही. तसेच आस्थापनेवर असलेले कर्मचारी व अधिकारी यांची संवर्गानुसार (मनपा भविष्य निर्वाह निधी वर्गणीदार असल्याची संख्या) संख्या दिलेली नाही. त्यामुळे वर्गणी कर्जहप्ता, व्याजाची आकारणी याबाबींची पडताळणी करता आली नाही.
2. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1988 नुसार संबंधित वर्गणीदारांनी परतावा/नापरतावा अग्रीमची मागणी विहित नमुन्यातील (परतावा व नापरतावा) या करता स्वतंत्र अर्ज नमुना 1 व 3 नुसार सादर केलेले नाही.

| आ.क्र. | कर्मचा-याचे नांव | क. क्रमांक |
|---|---|---|
| 1 | सरिता प्रभाकर राजोळे | 8982 |
| 2 | नवनित मनोहर काळे | 6220 |

उपरोक्त तक्त्यात नमुद कमर्चारी यांचे अर्ज अपुर्ण स्वरूपाचे असल्याचे दिसुन आलेले आहे.

3. भविष्य निर्विाहनिधीची रक्कम देतांना कर्मचा-यांच्या भविष्य निर्विाहनिधीच्या खात्यात किती वर्गणी जमा आहे. वषर्भरात एकुण किती वेळेस भ. नि. नि. रक्कम घेतलेली आहे. किती रक्कम शिल्लक आहे. याचा गोषवारा लेखा विभागाने सादर केलेला नाही. तसेच कर्मचारी यांचे भविष्य् निर्वाह निधीची रक्कम मिळणे बाबतचे मागणी पत्र समवेत आढळून येत नाही. उदा.

| आ.क्र. | कर्मचा-याचे नांव | क्र. क्रमांक |
|---|---|---|
| 1 | दशरथ बळवंत जाधव | 6882 |
| 2 | विजय मुरलिधर पाटील | 8782 |
| 3 | सरोदे उमेद काशिनाथ | 1101 |
| 4 | गायकवाड रविंद्र | 5350 |
| 5 | संपत बाबूराव गायकवाड | 8458 |
| 6 | सुरेश रावजी दवे | 1754 |
| 7 | अनिल वसंत कदम | 6902 |
| 8 | संजय चंदर चंडालिया | 6314 |
| 9 | गोपीनाथ् बाबूराव जाधव | 7857 |
| 10 | उमाजी पांडुरंग भुजबळ | 7876 |
| 11 | संदिप चिंतामन बरवे | 8892 |
| 12 | संतोष जाधव | 9165 |

उपरोक्त तक्त्यात नमुद कमर्चारी यांचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळणेकामी मागणी पत्र नसतांनाही त्यांना भविष निर्वाह निधीची रक्कम देण्यात आलेली आहे. याबाबत विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे.

4. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी नियम **1988 माधील 5** नुसार प्रत्येक भविष्य निर्वाहनिधी वर्गणीदाराने पहिल्या अनुसुचित देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये नामनिर्देशन करणे आवश्यक आहे. तथापी अशा प्रकारे कार्यवाही झालेली नामनिर्देशनपत्रे तपासणीसाठी उपलब्ध झाली नाही.

| आ.क्र. | कर्मचा-याचे नांव | क. क्रमांक |
|---|---|---|
| 1 | दत्तात्रय सुखदेव जाधव | 6619 |

5. सन 2019-2020 या आर्थिक वर्षाचे भविष्य निर्वाह निधीचे मयत/ स्वेच्छा निवृत्त व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी अधिकारी यांना त्यांच्या खात्यातील जमा असलेली वर्गणी देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी पडताळणी केली असता त्यातील खालील कर्मचारी यांना वर्षातून तिन वेळेस कर्जाऊ रक्कमा दिले असल्याचे निर्दशनास येते. उदा.

| अ.क्र. | कर्मचारी/अधिकारी नांव | कर्मचारी क्रमांक |
|---|---|---|
| 1 | श्री. निर्मला बी. साळवे सन 2012-2013) | 6677 |
| 2 | श्री.सुरेश चिमण गांगुर्डे (सन 2017-18) | 6132 |

6. ना परतावा अग्रीम काढण्याबाबत सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1988 मधील नियम क्र.16 ते 20 मधील तरतुदीनुसार वर्गणीदाराच्या सहा महिन्याच्या वेतना एवढी रक्कम किंवा निधीतील शिल्लक रक्कमेच्या 50% यापैकी जी कमी असेल ती रक्कम किंवा वर्गणीदाराच्या खात्यात शिल्लक रकमेच्या जास्तीत जास्त 75 % एवढी रक्कम मंजूर करू शकतो. सदर प्रकरणी परतावा, ना परतावा अग्रीम मंजूर करतांना कर्मचा-यांच्या खात्यातील शिल्ल्क रक्कम किती आहे व त्यानुसार अग्रीम मंजूरीस किती रक्कम पात्र आहे याबाबत कोणीतीही शहानिशा न करता जादा अग्रीम मंजूर करून अदा केले असल्याचे दिसून येते. उदा.

| आ.क्र. | कर्मचा-याचे नांव | क. क्रमांक |
|---|---|---|
| 1 | श्री. रामेरसिंग नकली चव्हाण | 2253 |

मार्च 2020 मध्ये श्री. रामेरसिंग नकली चव्हाण क. क्र. 2253 यांच्या खात्यात र. रू. 203237/- इतकी रक्कम शिल्लक होती. 75% प्रमाणे र. रू. 152428/- इतकी रक्कम अदा करणे आवश्यक असतांना त्यांना विवाह व इतर धार्मिक कामाकरीता 99% म्हणजे र. रू. 200000/- अदा केल्याचे दिसुन येते.

**नाशिक महानगरपालिकेच्या सन 2019-2020 या वित्तीय वर्षात कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यांतील अनियमितते बाबत.**

1. जा.क्र.मुलेप/वशि/डेस्क-6/06/20 दिनांक 09/04/2020 व जा.क्र. मुलेप/वशि /डेस्क -6 /65/20 दि. 18/05/2020 व रोजी अभिलेख्यांची मागणी केली असता विभागाचे याबाबतचे कोणतेही अभिलेखे विभागाने उपलब्ध करून दिलेले नाहीत.
2. नाशिक महानगरपालिकेत सन 2019-2020 आर्थिक वर्षात एकुण मनपा आस्थापनेवर किती कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत याबाबतची माहिती प्राप्त करून दिलेली नाही.
3. प्रत्येक कर्मचा-याचे सुरूवातीपासूनचे प्रत्येक वर्षनिहाय एकाच स्वतंत्र रजिष्टरवर खतावणी करण्यात आल्याचे दिसून येत नाही.
4. भविष्य निर्वाह निधी साठी महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार नामनिर्देशनमधील अधिनियम 5 (1) (2) (3) नुसार कार्यवाही

करून मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना व निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे परिशिष्ट-अ Form A नॉमिनेशन फॉर्म भरणेत आलेले दिसून येत नाही.

5. मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याबाबत वारसास भविष्य निर्वाह निधीतील अंतिम रक्कम महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार नामनिर्देशनमधील नियम 27 (1 ते 5) प्रमाणे कार्यवाही केलेली दिसून येत नाही.
6. एकत्रित गोषवारा नसल्याने विभागाने कर्मचारी निहाय चालु वर्षाची एकुण जमा उचल व देय व्याज तसेच खतावणी, बृहतपत्रक, रोखवही, अग्रीमचे परतावा ना परतावा रजिष्टर आढळून येत नाही.

जा.क्र.मुलेप/वशि डेस्क-5/89/20/दि.10/06/2020 रोजी पुन्हश्च: लेख्यांची मागणी बाबत अंतिम पत्र देण्यात आलेले असुनही तरी विभागाने यापुढे भविष्य निर्वाहनिधीचे लेखे पुर्ण/अद्ययावत करून प्रमाणीत लेखे उपलब्ध करून दिलेले नसल्याने सदरचा आक्षेप कायम करून सन 2019-2020 च्या अहवालत समाविष्ट करण्यात येत आहे.

लेखे पुर्ण/ अद्ययावत करणे बाबत सन 2017-18 व 2018-2019 या वर्षाच्या वार्षीक अहवालात आक्षेप नोंदवून अहवालात परिच्छेद घेण्यात आलेला असून, विभागास अवगत करण्यात आले होते. तथापि, विभागाने याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली दिसून येत नाही. लेखे अद्ययावत न ठेवणे ही बाब कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने गंभिर स्वरूपाची असून आक्षेपहार्य आहे. तरी विभागाने याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**परिच्छद क्र. २२ :- सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या परतावा, ना-परतावा प्रकरणांमधील अनियमितते बाबत.**

संदर्भ :- जा.क्र./मुलेप/डेस्क-18/722/29/10/2020.

वित्त व लेखा विभागाकडील सन 2019-20 या वित्तीय वर्षातील भविष्य निर्वाह निधीच्या परतावा/ ना परतावा प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमिता आढळून आली.

1) **मागणी पत्रकावर वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही.**

लेखा शाखेने तयार केलेल्या भविष्य निर्वाह निधी खाती संबंधित कर्मचारी यांच्या जमा व शिल्लक रकमेच्या तपशिल असलेल्या तक्त्यात मागणी पत्रका संबोधले आहे. लेखा शाखेकडून देण्यात आलेल्या मागणी पत्रकाच्या तपशिलानुसार विभागाकडून परतावा/नापरतावा रक्कम मंजूरी बाबत कार्यवाही केली जाते. सदर मागणी पत्रक लेखा शाखेतील प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | व्हौऊचर क्र. | दिनांक | कर्मचारी क्र. | कर्मचारी/अधिकारी नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 64 | 6/04/2019 | 5604 | बाळकृष्ण मनोहर बर्वे | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 2 | 68 | 9/4/2019 | 9045 | ए. एस. गायकवाड | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 3 | 53 | 4/4//2019 | 7211 | श्रीमती छाया पांडुरंग दाडे | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 4 | 97 | 9/4/2019 | 7641 | प्रदिप महाले | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 5 | 48 | 5/4/2019 | 6735 | अतुल जाधव | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 6 | 109 | | 5938 | मंगला सांगोरे | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 7 | 109 | | 5115 | आंचन न्युलीएट मार्कल | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 109 | | 5392 | लोंढे गब्रिएल एलसाबेध | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 9 | 4 | 9/5/2019 | 7485 | मदन दोंदे | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 10 | 33 | 9/9/2019 | 6733 | हिरामण मधुकर बोंबले | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 11 | 18 | 6/9/2019 | 8247 | मो. हुसेन इस्माईल पठाण | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 12 | 37 | 10/9/2019 | 5863 | आंबादास विष्णु शिरसाठ | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 13 | 22 | -- | 7808 | साबळे भगिरथ नाना | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 14 | 33 | 9/9/2019 | 8635 | भारती पोहनकर | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 15 | 45 | 9/9/2019 | 7254 | हिरा लोखंडे | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
| 16 | 45 | 9/9/2019 | 7254 | वैशाली पवार | वरिष्ठ लेखापाल यांची स्वाक्षरी नाही. |
